सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ **दिनांक :- १७/०२/२०२३**

ठराव क्रमांक :- ४४०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.भारती हेमंत दिगडे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

श्री.आनंदराव पवार (बापू) शिवसेना जिल्हाप्रमुख सांगली, सांगली जिल्हा नियोजन समिती, सदस्य यांनी महापालिका क्षेत्रातील अत्यावश्यक विकास कामांना निधी उपलब्ध होवून सदरची कामे मंजूर होणेसाठी मा.ना.श्री.डॉ.सुरेश (भाऊ) खाडेसो कामगार मंत्री,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री,सांगली जिल्हा यांचेकडे मागणी केलेनुसार तसेच, मा.ना.डॉ.सुरेश (भाऊ) खाडेसो यांनी आयुक्त,महानगरपालिका यांना दि.१३ फेब्रुवारी २०२३ चे दिलेल्या पत्रान्वये सन २०२२-२३ करिता जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नगरोत्थान योजनेमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होणेसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचा तपशिल	रक्कम रुपये (लक्ष)
१.	वॉर्ड क्र.१७ मधील मोती चौक परिसरातील मनपा ओपन स्पेस मध्ये सभागृह बांधणे.	२५ लक्ष
२.	वॉर्ड क्र.१७ मधील मंगलमुर्ती कॉलनी मनपा ओपन स्पेस मध्ये सभागृह बांधणे	२५ लक्ष
३.	सांगली येथील दरबार हॉल राजवाडा परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण तसेच पाणी निचरा व्यवस्थापन करणे.	११० लक्ष
४.	कुपवाड वॉर्ड क्र.१ बालाजीनगर येथील बाळकृष्ण नगर सोलंकार अपार्टमेंट ते खांडेकर घरापर्यत पी.सी.सी.गटर करणे.	१२ लक्ष
५.	कुपवाड वॉर्ड क्र.९ मधील शिंदेमळा येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रिटकरण करणे	२५ लक्ष
६.	कुपवाड वॉर्ड क्र.९ मधील सह्याद्रीनगर येथील सुमंगल वास्तु अपार्टमेंट ते हुसेन प्लाझा अपार्टमेंट पर्यत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	१० लक्ष
७.	सांगलीवाडी वॉर्ड क्र.१३ मधील जोतीबा मंदिर मागे सुतार प्लॉट सुनिल कोळी घर ते गजानन सिद्धघर रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	५ लक्ष
८.	गर्व्हमेंट कॉलनी वॉर्ड क्र.१९ मधील कलाकरुणा अपार्टमेंट ते अष्टविनायक चौक रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	१३ लक्ष
९.	कुपवाड वॉर्ड क्र.१ एस.टी.कॉलनी मधील अंतर्गत रस्ते करणे व गटर करणे.	४७ लक्ष

सूचक :- सौ. भारती दिगडे. ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi.

अनुमोदक :- सौ. पद्मश्री पाहीत महापौर,

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ **दिनांक :- १७/०२/२०२३**

ठराव क्रमांक :- ४४१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.अनिता मोहन वनखंडे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महासभा ठराव क्र.३८४ दि.२०/१२/२०२२ अन्वये सन २०२२-२३ करीता लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत एकुण २३२ कामांचा एकुण र.रु.३७,४६,३७,६००/- मात्रचा खालील कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत आलेली आहे. सदर प्रस्तावामधील अ.क्र.१७५ मिरज वॉ.क्र.०३ मधील रमा उद्यानाच्या पुर्वेस ड्रेनेज लाईन व्यवस्था करणे र.रु.७५,००,०००/- आणि अ.क्र.१७६ मिरज वॉ.क्र.०३ मधील रमा उद्यानाच्या पुर्वेस रस्ता करणे र.रु.५०,००,०००/- या दोन कामगिऱ्यांच्या ऐवजी तेवढ्याच रक्कमेच्या खालील नमुद केलेल्या कामगिऱ्यांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रुपये
१.	वॉर्ड क्रं .३ रमा उद्यान येथील ताम्हणकर घर ते कावडे घर रस्ता सुधारणा करणे	५,००,०००/-
२.	वॉर्ड क्रं .३ साईनंदन कॉलनी येथील ओपन स्पेस सुधारणा करणे.	१५, ००, ०००/-
३.	वॉर्ड क्रं .३ गजानन हौसिंग सोसायटी येथील समर्थ श्री नरसिंह मंदिर ते १०० फुटी रस्ता सुधारणा करणे.	१७,००,०००/-
४.	वॉर्ड क्रं .३ कपिला हौसिंग सोसायटी अग्रवाल अर्पाटमेट जवळील रस्ता सुधारणा करणे.	१३, ००, ०००/-
५.	वॉर्ड क्रं .३ मिरज येथील गेस्ट हाऊस समोरील सांळूखे घर ते गव्हाणे घर रस्ता सुधारणा करणे.	११, ००, ०००/-
६.	वॉर्ड क्रं .३ मिरज व्दारकानगर कोरे घर ते १०० फुटी रोड पर्यत रस्ता कॉक्रिटीकरण करणे.	९, ००, ०००/-
७.	वॉर्ड क्रं .३ मिरज तानाजी चौक (शिवा) तुळसनकर बोळ येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	१०,००,०००/-
८.	वॉर्ड क्रं .३ मिरज भारतनगर रिक्षा स्टॉप , माजी सैनिक रिक्षा स्टॉप, हनुमान मंदिर रिक्षा स्टॉप येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	१०,००,०००/-
९.	वॉर्ड क्रं .३ मिरज माळी गल्ली येथील आळतेकर बोळ येथील शिवाई व्यायाम मंडळ शेजारी पेव्हिग ब्लॉक बसविणे.	१०,००,०००/-
१०.	वॉ.क्रं. ३ कुपवाड रोड व्दारकानगर रस्ता डांबरीकरण करणे.	१०,००,०००/-
११.	वॉ.क्रं. ३ पंढरपूर रोड तोडकर प्लॉट (लक्ष्मी पार्क) येथील रस्ता डांबरीकरण करणे.	१५,००,०००/-

सूचक :- सौ. अनिता वनखंडे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. संगीता मेढे

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ **दिनांक :- १७/०२/२०२३**

ठराव क्रमांक :- ४४२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.संजय नायकू मेंढे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये वैद्यकिय आरोग्य सेवा गट अ मधील आरोग्य अधिकारी पदावर सातव्या वेतन आयोगानुसार एस -२० वेतन स्तरावर कार्यरत असलेले डॉ.सुनिल पांडुरंग आंबोळे हे वयाची ५८ वर्षे पुर्ण होणार असलेने निहित वयोमानानुसार दि.३१ मार्च २०२३ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे दि.२३ फेब्रुवारी २०२२ रोजीचे अधिसूचनेनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) (सुधारणा) नियम २०२२ मध्ये सुधारणा करणेत आलेली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ यातील नियम १० मधील पोट नियम (१) मध्ये कलम ४ मध्ये समाविष्ठ करणेत आलेली परंतुके दिनांक ०१ जून २०२२ पासून अंमलात आलेले असून, त्यामधील पहिल्या परंतुकामध्ये पुढील तरतुदीचा समावेश करणेत आलेला आहे.

" परंतु, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ मधील जिल्हा शल्य चिकित्सक, विशेषज्ञ, पोलिस शल्य चिकित्सक व वैद्यकिय अधिकारी संवर्गातील आणि महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट अ मधील वैद्यकिय अधिकारी संवर्गातील (सातव्या वेतन आयोगानुसार वेतन स्तर एस -२० आणि त्यापेक्षा वरच्या वेतन स्तरातील) अधिकारी हे ज्या महिन्यात वयाची ६० वर्ष पुर्ण करतील त्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यानोत्तर सेवा निवृत्त होतील. तसेच सदरची तरतुद दि.३१ मे २०२३ पर्यत अंमलात राहील.

उपरोक्त तरतुदीनुसार डॉ.सुनिल पांडुरंग आंबोळे आरोग्य अधिकारी यांना वयाच्या ६० वर्षापर्यत सेवेमध्ये मुदतवाढ देता येत असलेने, त्यांना दि.३१ मार्च २०२३ पासून दि.३१ मार्च २०२५ पर्यत दोन वर्ष मुदतवाढ देणेस मा.शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संजय मेंढे

अनुमोदक :- श्री. शेउजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

प्रशा.अधि.(आस्था)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ **दिनांक :- १७/०२/२०२३**

ठराव क्रमांक :- ४४३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.नसिम सलीम शेख यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील सि.स.न.५४५ पैकी कोल्हापूर रोड हद्दीलगत पै.जोतीराम दादा पाटील सावर्डेकर कुस्ती आखाडा या जागेमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान योजना (राज्यस्तर) अंतर्गत कुस्ती आखाडा नुतनीकरण व शॉपिंग कॉम्पलेक्स विकसीत करणेचे काम मंजूर असून, सध्या कुस्ती आखाडा नुतनीकरणाचे काम सुरु आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये शॉपींग कॉम्पलेक्स बांधकाम समाविष्ठ असून,त्या अंतर्गत १० दुकान गाळे व शौचालय असे बांधकाम प्रस्तावित असून, त्यासाठी बांधकाम परवान्याकरीता जा.क्र.मनपा/बांधवि/सां/६४०/२०१९-२० दि.२८/११/२०१९ अन्वये नगररचना विभागाकडे प्रस्ताव सादर केलेनुसार सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून जा.क्र.मनपा /टिपी/७/९/जन/८२०/२०२०-२१ दि.०२/०७/२०२० अन्वये अभिप्राय प्राप्त झाला असून, सदर अभियप्रायानुसार प्रस्तावित बांधकाम हे पब्लिक युटिलीटी झोन / पंप हाऊस मध्ये समाविष्ठ आहे. सदर जागेवर बांधकाम नियमावलीनुसार २५.६ (X) नुसार इलेक्ट्रिक सबस्टेशन,रिसीव्हींग स्टेशन, स्वीच यार्डस्, ओव्हर हेड लाईन कॉरिडॉर, रेडिओ व टेलिव्हीजन स्टेशन, मेन स्टेशन फॉर पब्लिक गॅस डिस्ट्रीब्युशन, स्वेज ट्रिटमेंट अॅण्ड डिस्पोजल वर्क, वॉटरवर्क्स Along with residential quarters for essential staff for such works wth special permission of the municipal Commissioner अशा स्वरुपाचे बांधकाम परवानगी देता येईल तसेच सदर प्रस्तावित इमारतीच्या कोल्हापूर रोड हद्दीलगत आरक्षण क्र.१६४ Khoka Resettlement चे आरक्षण आहे. मा.कार्यकारी अभियंता,पाटबंधारे विभाग,सांगली यांचेकडील Blue Line व Red Line नकाशानुसार, सदर जागा Red Line (लाल पूर रेषा) मध्ये समाविष्ठ असल्याने, सदर जागेवर वाणिज्य स्वरूपाचे शॉपिंग कॉम्पलेक्सच्या इमारतीला बांधकाम परवानगी देणे अनुज्ञेय होत नाही असे मा.सहाय्यक संचालक नगररचना यांचे मत आहे.

सदर कामाचे एकुण अंदाजपत्रक र.रू.१,९९,२५,०६९/- मात्रचे असून, त्यात कुस्ती आखाडा नुतनीकरण व रस्त्यासाठी र.रू.९५,२०,०६४/- व शॉपिंग कॉम्पलेक्ससाठी र.रू.७३,४३,७२५/- असा निधी मंजूर आहे. याबाबत मा.आयुक्तसो,यांचे समवेत झाले चर्चेनुसार, सदर काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान योजना (राज्यस्तर) र.रू.१०० कोटी मधील असून, सदर शासन निधी खर्च करणे आवश्यक आहे. तसेच सहा.संचालक नगररचना यांचे अभिप्रायानुसार उक्त ठिकाणी शॉपींग कॉम्पलेक्स बांधणे अनुज्ञेय होत नाही. त्यामुळे या कामी मंजूर झालेला निधी र.रू.७३,४३,७२५/- हा शासनाकडे परत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर कामगिरी मधील कुस्ती आखाड्यामध्ये अजून बरीच अनुषंगिक व अत्यावश्यक कामे करणे बाकी असल्याने, सदरचा उर्वरित मंजूर निधी र.रू.७३,४३,७२५/- मात्र हा कुस्ती आखाड्यातील राहिलेल्या कामासाठी वापरणेसाठी मा.शासनाची मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. नसिम शेख

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. रोडगी मोहिते

D. Suryavanshi

महापौर,

सहाय्यक आयुक्त
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ **दिनांक :- १७/०२/२०२३**

ठराव क्रमांक :- ४४४

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.भारती हेमंत दिगडे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१७ नेमिनाथनगर येथील वाडीकर मंगल कार्यालया शेजारील मनपा मालकीच्या खुल्या जागेमध्ये महिला व बालकल्याण समिती निधीमधून विकसीत करणेत आलेले चिल्ड्रन पार्कला भारताचे माजी पंतप्रधान, सिद्ध साहित्यीक,लेखक भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी असे नामकरण करणेस विहित मुदतीत कोणत्याही सूचना/हरकती प्राप्त न झालेने, सदर ठिकाणच्या चिल्ड्रन पार्कला भारताचे माजी पंतप्रधान, प्रसिद्ध साहित्यीक,लेखक भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- सौ.भारती दिगडे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री शेडजी मोहिते D. P. Suryavanshi महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका